नि. फौ. ख. क्र.१६५/२०१८ निशाणी ३६

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. २ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – सरला राहुल तेलगोटे

वय – ३९ वर्षे, व्यवसाय – घरकाम

पत्ता – यशवंत नगर, बायपास, अकोला, ता. जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. व्ही. इंगळे यांचेमार्फत सरतपास सुरुः**

१. आरोपी राहुल तेलगोटे सोबत माझे लग्न सन २००३ मध्ये यशवंत नगर, बायपास, अकोला येथे झाले होते. मला लग्नापासुन ३ अपत्ये असुन त्यांची नावे अनुक्रमे ऋषीकेश, श्रध्दा आणि आदित्य अशी आहे. लग्न झाल्यानंतर मी कान्हेरी गवळी येथे नांदावयास गेली. घरात माझे पती व्यतिरिक्त सासु, सासरे, दिर असे राहत होते. माझे सासरकडील मंडळी माझे चारित्र्यावर संशय घेत होते. माझे चारित्र्यावर संशय घेवुन ते माझे पतीला भडकवत होते. त्यामुळे माझे पती मला मारहाण करुन मला माझ्या माहेरी सोडुन देत असे. मला मुले असल्याने मी सदर त्रास सन २०१८ पर्यंत सहन केला. माझे सासरकडील मंडळीच्या वर्तणुकीत सुधार होईल असे मला वाटत होते. त्यांच्या वर्तणुक मध्ये कोणतीही सुधारणा झाली नाही. माझे सासरे व पती मी कचरा टाकण्यास गेली असता माझ्या मागे येवुन पाहत होते. मला कोणाशी बोलु देत नव्हते. ते माझ्याशी भांडण करित होते. मला २ नंदा आहे. माझ्या नंदा 'ती चांगली नाही, तिला सोडुन दे' असे म्हणुन माझे पतीला भडकावुन देत असे. त्यामुळे माझे पती मला मारहाण करित असे.

२. दि. १४.०१.२०१८ रोजी सकाळी ०९.००–०९.३० वाजता मी माडीवर मुंग वाळु घालण्यासाठी गेली होती. मी गच्चीवरुन माझ्या शेजारी राहणाऱ्या महिलेसोबत बोलत असतांना माझ्या पतीने येवुन मला केस धरुन खाली ओढत आणले व लाथाबुक्यांनी मारहाण केली. मला पाठीवर, पोटावर व मानेवर मारहाण केली. दि. १५.०१.२०१८ रोजी माझे पतीने मला लाथाबुक्यांनी मारहाण केली. माझे पतीने मला

सांगितले की, येथे राहायचे नाही. माझे पतीने माझे बहिणीच्या मुलाला फोन लावुन मला घेवुन जाण्यास सांगितले. त्यानंतर माझे बहिणीचा मुलगा व मामे भाउ मला घेण्यासाठी आले. माझे पती व सासऱ्यांनी बहिणीचा मुलगा आणि मामे भाउ यांचे सोबत वाद घातला. बहिणीचा मुलगा व मामे भाउ यांच्या सोबत वाद घालुन मला घेवुन जाण्यास सांगितले. त्यानंतर मी माझ्या माहेरी आले. मी माझ्या माहेरी येवुन उपचार घेतला. त्यानंतर मी बाळापूर पोलीस स्टेशनला येवुन रिपोर्ट दिला. आता मला सदर रिपोर्ट दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ३७** देण्यात येत आहे. त्यापुर्वी मी सन २००९ मध्ये महिला मंडळ, अकोला येथे अर्ज केला होता. तेथे समझोता झाला होता. मला सदर समझोत्याचा करार दाखविण्यात आला. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **वस्तु निशाणी अ** देण्यात येते. मी बाळापूरला रिपोर्ट दिल्यानंतर केस पुन्हा महिला मंडळला गेली. मी पोलीस अधिक्षक, अकोला यांच्याकडे दिलेला तक्रार अर्ज दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ३८** देण्यात येत आहे. महिला तक्रार निवारण समिती, अकोला यांच्याकडे दोघांचे समुपदेशन केले. दि. ०७.०३.२०१८ रोजीच्या तक्रार निवारण समिती कडील रोजनाम्यावर मला आरोपींविरुध्द तक्रार दाखल करावयाची असल्याचे मी लिहुन दिले. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र. ३९** देण्यात येते. आरोपींनी मला माहेरहुन शेत खरेदी करण्यासाठी पैसे आणण्यास सांगितले तेव्हा मी माझे माहेरहुन पैसे आणुन दिले होते. आरोपींनी नंतर माझ्याकडे किराणा दुकान बांधण्यासाठी रु. ५०,०००/– ची मागणी केली होती. या व्यतिरिक्त काही घडले नाही. आजरोजी माझे सासरे सोडुन इतर आरोपी न्यायालयात हजर आहे. माझे सासरे वारले आहे.

सरतपास पूर्ण.

<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस.टी.इंगळे यांचे मार्फत</u>

३. सन २०१८ मध्ये ऋषीकेश १४ वर्षाचा, श्रध्दा १२ वर्षाची आणि आदित्य ११ वर्षाचा होता. ऋषीकेश व आदित्य हे वाडेगाव येथे शिकत होते आणि श्रध्दा

गावाच्या शाळेत शिकत होती. जेव्हा मी माझ्या आईकडे माहेरी गेली त्यावेळी माझी मुले वाडेगाव येथे शिकत होती व मुलगी गावातील शाळेत शिकत होती. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, मी माहेरी गेली त्यावेळी माझे मुले शाळेत गेली होती आणि श्रध्दा घरी होती. मी रिपोर्ट दिल्यानंतर मा. जिल्हा न्यायालय, अकोला येथे माझे तिन्ही मुलांचा ताबा मिळणेकरिता माझे पती विरुध्द अर्ज दाखल केला होता. माझे मुलांना मा. तदर्थ जिल्हा न्यायाधीश साहेबांनी वैयक्तीक कक्षात बोलवुन त्यांच्याकडे चौकशी केली होती.

प्रश्न - चौकशी दरम्यान तुमच्या मुलांनी त्यांना आईकडे राहावयाचे नसुन वडीलांकडे राहावयाचे आहे असे सांगितल्यामुळे मा. जिल्हा न्यायाधीश यांनी मुलांचा ताबा तुम्हाला दिला नाही ?

उत्तर - माझ्या मुलांनी मा. जिल्हा न्यायाधीश साहेबांना काय सांगितले त्याबद्दल मला माहित नाही.

मी दाखल केलेल्या मुलांच्या ताब्याच्या प्रकरणात माझा व माझ्या पतीचा पुरावा झालेला होता. मा. जिल्हा न्यायाधीश साहेबांनी आमचे पुरावे झाल्यानंतर माझा अर्ज फेटाळला आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, मा. जिल्हा न्यायाधीश साहेब यांनी मला मुलांची भेट घेण्याची परवानगी दिलेली आहे. मा. जिल्हा न्यायाधीश साहेबांनी मला महिन्यातुन एक वेळा मुलांना भेटण्याचे ठिकाण पुर्वी माझे पतीला कल्पना देवुन निश्चित करुन मुलांवर कोणतीही जोर जबरदस्ती करणार नाही या अटी शर्तीवर परवानगी दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आदेश झाल्यानंतर मी मुलांना भेटण्याचा कधीही प्रयत्न केला नाही.

४. मी ज्यावेळी पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला त्यावेळी बाळापूर पोलीस स्टेशन येथे पो.उप.निरिक्षक श्री. शिरसाठ होते. श्री. शिरसाठ हे माझे नातेवाईक आहे. हे म्हणणे खरे नाही की, रिपोर्टची सर्व कार्यवाही श्री. शिरसाठ यांनी केली. रिपोर्ट माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिला होता. रिपोर्ट दिल्यानंतर पोलीसांनी माझे बयान माझ्या सांगण्या प्रमाणे नोंदविले होते. दि. १४.०१.२०१८ रोजी **सकाळी ०९.००–०९.३० वाजता मी माडीवर मुंग वाळु घालण्यासाठी** गेली होती, गच्चीवरुन माझ्या शेजारी राहणाऱ्या महिलेसोबत बोलत असतांना माझ्या पतीने येवुन मला केस धरुन खाली ओढत आणले, दि. १५.०१.२०१८ रोजी माझे पतीने मला लाथाबुक्यांनी मारहाण केली. माझे पतीने

मला सांगितले की, येथे राहायचे नाही, माझे पतीने माझे बहिणीच्या मुलाला फोन लावुन मला घेवुन जाण्यास सांगितले, त्यानंतर माझे बहिणीचा मुलगा व मामे भाउ मला घेण्यासाठी आले, मी माझ्या माहेरी येवुन उपचार घेतला, आरोपींनी मला माहेरहुन शेत खरेदी करण्यासाठी पैसे आणण्यास सांगितले तेव्हा मी माझे माहेरहुन पैसे आणुन दिले होते, आरोपींनी नंतर माझ्याकडे किराणा दुकान बांधण्यासाठी रु. ५०,०००/– ची मागणी केली होती, या सर्व बाबी मी पोलीसांना रिपोर्ट व बयान देतांना सांगितल्या होत्या. या सर्व बाबी माझ्या रिपोर्ट व बयानात नमुद नसल्याचे कारण मला सांगता येणार नाही.

५. मी उपचार घेतल्याचे कागदपत्र पोलीसांना रिपोर्ट देतेवेळी दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या माहेरी मी कोणतेही उपचार घेतले नसल्याने सदरचे कागदपत्र मी पोलीसांना दिले नाही. माझे माहेरी यशवंत नगर, अकोला येथुन जुने शहर पोलीस स्टेशन येथे जाण्यासाठी एक दिड तास लागतो. कान्हेरीवरुन बाळापूर येथे येण्यासाठी नेहमी वाहन उपलब्ध असतात. कान्हेरी येथुन बाळापूर येथे ऑटोने पोलीस स्टेशन मध्ये येण्यासाठी जास्तीत जास्त अर्धा तास लागतो. हे म्हणणे खरे नाही की, मला माझे पती सोबत राहावयाचे नव्हते म्हणुन मी माझे मुलांना सोडुन माझे माहेरी राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असलेली कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींविरुध्द खोटा रिपोर्ट दिला. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील संपुर्ण मजकूर मी खोटा सांगितलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना फसविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2024.10.24 11:00:06 +0530

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.

बाळापूर.
दि. २३/१०/२०२४